CNR No. MHCH040007602022

**सत्र खटला क्रमांक ५०/२०२२**

**महाराष्ट्र शासन**

**मार्फत**

**पो.स्टे. वरोरा**

**वि.**

**संजय उर्फे संजु  राजु चेटटी +१**

**अर्जदार :– शैलेंद्र गणपतराव अहेरवार**

**निशाणी क्र. ३८ वर आदेश**

(पारित दिनांक २७ जुलै २०२६)

१. अर्जदार याने वरोरा पोलीस स्टेशन येथील अपराध क्र.४२६/२०२२ मध्ये विवो वाय २० कंपनीचा मोबाईल हा जप्त केलेला असुन तो सुप्रतनाम्यावर मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. सदरचा मोबाईल हा अर्जदाराच्या मालकीचा आहे. सदरच्या मोबाईलचा IMEI no. 868867057164074 असा आहे. त्याकरीता अर्जदाराने नि.क्र.४० च्या यादीप्रमाणे मोबाईलचे बील व स्वतःचे आधार कार्ड दाखल केलेले आहे.

२. सदर प्रकरणात सरकारी अभियोक्ता यांचा अभिप्राय मागविण्यात आला. त्यानुसार त्यांनी निशाणी क्र.४१ वर त्यांचा अभिप्राय दाखल केला आहे. गुन्हयातील जप्त मोबाईल अर्जदाराला सुप्रतनाम्यावर परत केल्यास त्याचा वापर इतर गुन्हे करण्यासाठी होण्याची अधिक शक्यता आहे. त्यामुळे गुन्हयाचे स्वरुप, गांभीर्य लक्षात घेता अर्जदार सदरच्या मोबाईलचा रंग बदलण्याची, तो इतर व्यक्तींना विकण्याची, भेट

देण्याची किंवा जप्त केलेल्या मोबाईलच्या पुराव्याचे स्वरुप बदलण्याची शक्यता आहे. करिता अर्ज नामंजुर करणेस विनंती.

३. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी आपआपल्या कथनाप्रमाणे युक्तीवाद केला.

४. वि. सरकारी वकीलांनी अर्जास विरोध करण्याचे कारण सांगीतले आहे की, अर्जदार पुन्हा गुन्हा करण्यासाठी सदरच्या मोबाईलचा वापर करेल. परंतू या कारणाकरिता अर्ज रदद करता येणार नाही व अटी व शर्तीवर अर्ज मंजुर करता येईल. अर्जदारास रोजच्या वापराकरिता मोबाईल आवश्यक आहे. अर्ज रद्द केल्यास अर्जदाराचे आतोनात असे नुकसान होईल कारण खटला चालण्यास विलंब होईल व त्यामुळे मोबाईलची अवस्था खराब होईल. अर्जदार हा सदर मोबाईलचा मालक असून त्यांनी त्याचे खरेदी बील सादर केले आहे. अर्जदार सदरचे प्रकरणात आरोपी नाही. त्यामूळे अटी व शर्तीवर सदरचा मूद्देमाल अर्जदाराच्या कब्जात देण्यास हरकत नाही. त्यामूळे अर्ज मंजुर करावा लागेल. त्याकरिता मी पूढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अपराध क्र. ४२६/२०२२ मध्ये विवो वाय २० कंपनीचा मोबाईल IMEI no. 868867057164074 **अर्जदार शैलेंद्र गणपतराव अहेरवार**, राह. ६१-सी/२/१ ओ.एफ. चांदा, तह. भद्रावती, जि. चंद्रपूर यास रु.१०,०००/- (अक्षरी रु. दहा हजार ) चे नुकसान भरपाईचे पत्र (Indemnity Bond) आधारे परत देण्यात यावी.

३. अर्जदारास असे निर्देशीत करण्यात येते की, सदरचा मोबाईल कोणालाही विक्री, अथवा अन्य कोणत्याही कारणाने हस्तांतरण करू नये.

४. अर्जदाराने सदराच्या मोबाईलच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल करू नये.

५. अर्जदाराने न्यायालयात पुराव्याकामी सदर मोबाईलची ज्या ज्या वेळी आवश्यकताा भासेल त्या त्या वेळी न्यायालयात हजर करण्यास टाळाटाळ करू नये.

Digitally signed by ATUL KESHAOLAL SHAH
Date: 2026.07.27 16:11:00 +0530

दिनांकः २७/०७/२०२६

**( अतुल के. शाह )**
अति.सत्र न्यायाधिश, वरोरा.